पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
रवींद्र नाटय मंदिर, मिनी थिएटर इ. यांचे
सुधारित भाडयाचे दरास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक- पुलदे-२०१३/प्र.क्र.१३४/सां.का.२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ :- (१) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुलदे २०१३/प्र.क्र.१३४/ सां.का.२, दि.०३.०३.२०१५.
(२) शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुलदे २०१३/प्र.क्र.१३४/सां.का.२, दि.०४.०६.२०१५.
(३) प्रकल्प संचालक पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र. पुलअ ४७२२, दि. १४.०९.२०१७.

शुध्दीपत्रक :-

शासनाने संदर्भ क्र. १ येथील दि.०३.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलातील रवींद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर, आर्ट गॅलरी इत्यादीचे भाडयाचे दर निश्चित केले आहेत तसेच त्याबाबतच्या अटी व शर्ती विहित केल्या आहेत. तद्नंतर प्रकल्प संचालकांच्या विनंतीनुसार सदर शासन निर्णयात काही सुधारणा करण्यात आल्या होत्या, याबाबतचे शुध्दीपत्रक संदर्भक्रमांक २ अन्वये दि. ०४.०६.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

२. आता प्रकल्प संचालक यांनी संदर्भ क्र. ३ पत्रान्वये मिनी थिएटर मधील अमराठी कलाविष्कारांचे व अन्य कार्यक्रमांचे शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशीचे दुपार व रात्रीचे सत्राच्या भाडेदरात समानता आण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. याबाबत विचार विनिमय करून शासन आता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-ब, मधील मिनी थिएटर यामध्ये खालील प्रमाणे भाडे दरात सुधारणा करण्यास मान्यता देत आहे.

अमराठी कलाविष्कारासांठी

सत्र	संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये निश्तिच भाडे दर (सेवा कर व इतर शुल्क वगळून) प्रती सत्र	सुधारित भाडे दर (सर्व कर वगळून) प्रती सत्र
रात्रौ	रू. ११,०००/-	रू. १२,०००/-

अन्य कार्यक्रमासांठी

सत्र	संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये निश्तिच भाडे दर (सेवा कर व इतर शुल्क वगळून) प्रती सत्र	सुधारित भाडे दर (सर्व कर वगळून) प्रती सत्र
रात्रौ	रू. १४,०००/-	रू. १५,०००/-

३. उपरोक्त प्रमाणे सुधारित भाडे दर या शुध्दीपत्रकाच्य दिनांकापासून अमलात येतील. तसेच या संदर्भात अटी व शर्ती संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन शुध्दीपत्रकान्वये निश्चित केल्याप्रमाणे असतील.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्र. २०१८०२०५१६१८२३४०२३ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2018.02.05 16:27:30 +05'30'

(अनिस शेख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक.
४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
५) उपसचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक.
६) प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई.
७) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
८) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) १ महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११) निवड नस्ती, सां.का.२.